प्रेसनोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री.शितल पांडूरंग गेडाम, वय ४२ वर्ष, व्यवसाय नोकरी वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) लोणार,वर्ग–२ रा. दुर्गा माता वार्ड घांटजी,ता.घांटजी जि.यवतताळ हमु. लोणार |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | --- |
| घटना स्थळ | वन निरीक्षण कुटी,वन विभाग, लोणार |
| घटना तारीख | ३१.०१.२०२० |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा कडे तक्रार दिली होती की,त्यांना लोकसेवक श्री. गेडाम,वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) लोणार हे तक्रारदार याना लोणार येथील सिता न्हानी याठिकाणी फोटो काढल्याचे कारणा वरून गुन्हा दाखल न करण्याकरीता ५०,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार अँन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरून दिनांक ३१.०१.२०२० रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक श्री. शितल पांडूरंग गेडाम,वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) लोणार यांनी तक्रारदार याना लोणार येथील सितान्हानी याठिकाणी फोटो काढल्याचे कारणा वरून गुन्हा दाखल न करण्याकरीता पडताळणी कार्यवाही दरम्यान तडजोडीअंती २०,०००/– रूपये लाचेची मागणी केली व लाचस्विकारण्याची तयारी दर्शविलयाने दिनाक दि.३१.०१.२०२०रोजी रितसरसापळा कार्यवाही आयोजित केली असता लोकसेवक श्री.शितल गेडाम,वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव)लोणार यांना तक्रारदार यांचे वर संशय आल्याने लाचेची रक्कम स्विकारली नाही. आलोसे श्री. शितल पांडूरग गेडाम,वय ४२ वर्ष,वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव)वर्ग–२,लोणार रा. दुर्गा माता वार्ड,घांटजी ता.घांटजी जि.यवतमाळ ह.मु.लोणार जि.बुलडाणा यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैश्याचे स्वरुपातील अर्थिक लाभ मिळविण्यासाठी लोकसेवक पदाला न शोभनारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन लोणार येथे अपराध क्रमांक ३४/२०२० कलम ७ लाचलुचपत प्रतीबंधक कायदा संशोधन २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही :–

१. मा. श्री. श्रीकांत धिवरे,पोलीस अधिक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो,अमरावती

२. मा. श्री. पंजाबराव डोंगरदिवे,अप्पर,पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. शैलेश प्र. जाधव, पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा. व सापळा पथक पोना.विलास साखरे,मो.रिजवान,पोकॉ विनोद लोखंडे,पोकॉ जगदीश पवार,चालक पोकॉ मधुकर रगड यांनी पार पाडली.शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अँन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

(शैलेश प्र.जाधव )
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा

Scanned by CamScanner